*CNR No. MHND240010232023*

<u>नि. दि. दा. क्र. २२२/२०२३</u>
<u>कमलाबाई वि. व्यंकटी व इतर</u>

## <u>निशाणी क्र. १९ खालील आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. २ तर्फे प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ चे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हा कामासाठी बाहेरगावी असल्यामुळे न्यायालयात हजर राहु शकला नाही. त्यामुळे त्यांना वादीचा उलटतपास घेणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. सदर दाव्यामध्ये दावा मिळकतीसंदर्भात व प्रतिवादी यांचे हक्क व अधिकार आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेणे गरजेचे आहे. त्यामुळे 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. या उलट, वादीच्या विधीज्ञांनी सदर अर्जावर आक्षेप नोंदविला की, प्रतिवादी यांच्या अर्जातील कारण योग्य नाही. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करावा.

४. वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुद्ध वाटणी व मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादीने स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक २६/११/२०२४ व वादीतर्फे साक्षीदार क्र.२ च्या सरतपासाचे शपथपत्र दिनांक ०९/०४/२०२५ रोजी दाखल केले असुन प्रतिवादी क्र.२ यांनी वादीचा उलटतपास न घेतल्यामुळे दिनांक २४/०३/२०२५ रोजी उलटतपास नाही आदेश पारित करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. २ यांना

उलटतपास घेण्याकरीता भरपूर संधी देण्यात आली होती, परंतु त्यांनी उलटतपास घेतला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी अर्जात उलटतपास न घेण्याचे जे कारण नमुद केले आहे ते कारण योग्य वाटत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता वादीचा उलटतपास घेणे गरजेचे आहे. याकरिता, प्रतिवादी क्र. २ यांना उलटतपासाची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. मात्र प्रतिवादी क्र. २ यांनी केलेल्या विलंबामुळे वादीला जो असोयीस्करपणा झाला, त्याकरीता प्रतिवादी क्र. २ यांना खर्च लावणे योग्य व संयुक्तिक आहे. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**१.** सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी वादीस रक्कम रु. १०००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. २ यांच्या विरुद्ध झालेला 'उलटतपास नाही आदेश' रद्द करण्यात येतो व उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

ASMA TUKARAM GITTE
Digitally signed by ASMA TUKARAM GITTE
Date: 2025.07.11 11:51:23 +0530

**(श्रीमती ए. टी. गित्ते)**

दि. १०/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगाव.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | A.S. Naik |
| Court | - | Court of Civil Judge, Jr. Div. & J.M.F.C., Naigaon . |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 11/07/25 |
| Judgment/Order uploaded on | - | 11/07/25 |